**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस
- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून आणखी चार उमेदवारांच्या नावांची घोषणा / भाजपाचे उन्मेष पाटील उद्धव ठाकरे यांच्या पक्षात दाखल
- आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय सीमांवर अवैध दारू, अंमली पदार्थ, रोकड, इत्यादींचा ओघ रोखण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे निवडणूक आयोगाचे सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश
- यंदा भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साडेसात टक्के दरानं होण्याचा जागतिक बँकेचा सुधारित अंदाज

**आणि**

- छत्रपती संभाजीनगरमधल्या छावणी परिसरात दुकानाला लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. त्यामुळे राज्यात अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला आता वेग आला आहे.

**नांदेड** लोकसभा मतदारसंघात आज ९ उमेदवारी अर्ज दाखल झाले. आतापर्यंत १९ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले. काँग्रेस उमेदवार वसंतराव चव्हाण यांनी माजी शिक्षणमंत्री अमित देशमुख यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला. त्यांनी दोन अर्ज दाखल केल्यामुळे या मतदार संघात १९ उमेदवारांचे २० अर्ज दाखल झाले आहेत. दरम्यान नांदेड जिल्ह्यात वडेपूरी इथं जिल्हा ग्रामीण विकास

यंत्रणेच्या उमेद अभियानातंर्गत आज दोन लाखांहून अधिक महिलांनी शंभर टक्के मतदान करण्याची शपथ घेतली.

**परभणी**त आज १८ उमेदवारांनी ३० उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. स्वाभिमानी पक्षाचे किशोर ढगे यांनी अर्ज दाखल केला.

**अकोला** मतदारसंघातले भाजपाचे उमेदवार अनुप धोत्रे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते.

**यवतमाळ- वाशिम** लोकसभा मतदारसंघासाठी ४ उमेदवारांनी ५ उमेदवारी अर्ज दाखल केले. संजय देशमुख, धरम ठाकूर, संगीता चव्हाण, विशाल वाघ या उमेदवारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज लोकसभा निवडणुकांसाठी चार उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. कल्याणमधून वैशाली दरेकर, पालघरमधून भारती कामडी, जळगावमधून करण पवार आणि हातकणंगलेमधून सत्यजित पाटील यांना उमेदवारी दिल्याचं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलं.

महाविकास आघाडीच्या जागावाटपानुसार नावं जाहीर केली आहेत, असं ते म्हणाले. उत्तर मुंबई आणि उत्तर मध्य मुंबई मतदारसंघात मित्रपक्ष काँग्रेसनं निवडणूक लढवावी अशी इच्छा असून त्यांनी आपले उमेदवार जाहीर करावेत, त्यांना लढवायची नसेल तर उत्तर मुंबईत आम्ही उमेदवार देऊ, असंही ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जळगावचे भाजपाचे खासदार उन्मेष पाटील यांनी अनेक पदाधिकाऱ्यांसह आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. पाटील यांना जळगाव लोकसभा मतदारसंघातून भाजपाची उमेदवारी मिळाली नसल्यामुळं ते गेल्या काही दिवसांपासून नाराज होते.

<><><><><>

बळीराजा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब रास्ते यांनी आज सांगली इथं सात उमेदवारांची यादी जाहीर केली. या पक्षानं प्रदीप ढोबळे यांना भंडाऱ्याची, संविधान लोखंडे यांना रामटेकची, संभाजी गुणाट यांना पुणे मावळची, कैलास पवार यांना परभणीची, शिवाजीराव माने यांना हातकणंगलेची, आनंदराव नालगे-पाटील यांना सांगलीची आणि शंकर तडाखे यांना लातूरची उमेदवारी मिळाली आहे.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय सीमांवर अवैध दारू, रोख रक्कम, अंमली पदार्थ आणि मोफत वस्तुंचा ओघ रोखण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. निवडणूक आयोगानं या संदर्भात सर्व राज्यातले मुख्य सचीव, पोलीस महानिदेशकांबरोबर आज नवी दिल्ली इथं आढावा बैठक घेतली. तसंच महाराष्ट्रासह ११ राज्यातल्या संवेदनशील मतदान केंद्रावर केल्या जाणाऱ्या विशेष व्यवस्थेसंदर्भातही या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, सुखबीर सिंग संधू उपस्थित होते.

<><><><><>

मुंबई शहर आणि मुंबई उपनगर, या दोन्ही जिल्ह्यांमध्ये येत्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगानं कायदा आणि सुव्यवस्थेबाबत केल्या जात

असलेल्या नियोजन आणि अंमलबजावणीबाबतचा सविस्तर आढावा आज मुंबई शहर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संजय यादव, आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी घेतला.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य ती अंमलबजावणी काटेकोरपणे आणि वेळच्यावेळी करावी, असे निर्देश राजेंद्र क्षीरसागर यांनी दिले. तर, जिल्हा आणि जिल्ह्यालगतच्या सीमांवर, तसंच समुद्र किनाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देश संजय यादव यांनी दिले. विविध शासकीय संस्थांमध्ये आपसात समन्वय राहील याची काळजी घ्यावी, अशाही सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या.

यावेळच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व समाजघटकांनी प्रयत्न करावेत, असं आवाहन संजय यादव यांनी वार्ताहर परिषदेत बालताना केलं…

**होल्ड-बाईट -संजय यादव**

**<><><><><>**

२०२४ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साडेसात टक्के दरानं होईल, असा सुधारित अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे. येत्या दोन वर्षांत दक्षिण आशिया हा विभाग जागतिक पातळीवर सर्वाधिक विकसनशील विभाग ठरेल आणि २०२५ या वर्षात त्याचा विकासदर सहा पूर्णांक एक दशांश टक्के असेल, असंही या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर मधल्या छावणी परिसरातल्या एका दुकानाला आज लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातल्या नागरिकांनी बचावकार्य करण्याचा प्रयत्न केला तसंच पोलीस आणि अग्निशमन

दलानं घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत सात जणांचा मृत्यू झाला होता. दुचाकी चार्जिंगला लावल्यानं ही आग लागली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

<><><><><>

केंद्रीय मंत्री डॉ. एल मुरुगन यांच्यासह राज्यसभेच्या ११ सदस्यांना उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज पद आणि गोपनियतेची शपथ दिली. महाराष्ट्रातल्या मेधा कुलकर्णी आणि चंद्रकांत हंडोरे यांचाही त्यात समावेश आहे. या आठवड्यात  माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्यासह वरिष्ठ सभागृहातले ५६ सदस्य निवृत्त झाले आहेत.

<><><><><>

केरळातल्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी कलपेट्टा इथं◌ं एका रोड शोचं नेतृत्व केलं. त्यांच्यासोबत पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी, के सी वेणुगोपाळ आणि इतर नेते उपस्थित होते.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्सचा सामना कोलकाता नाईट राईडर्सशी होणार आहे. विशाखापट्टणम इथं वाय एस राजशेखर रेड्डी क्रिकेट स्टेडियमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होणार आहे.

कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून, प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

इयत्ता पहिली, दुसरी, सातवी, आठवी, दहावी आणि बारावीची ३३ लाख शालेय पाठ्यपुस्तकं देशभरातल्या पुस्तक विक्रेत्यांकडे पाठवल्याचं एन सी ई आर टी, अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं म्हटलं आहे. अन्य

इयत्तांची पुस्तकं या महिन्यात उपलब्ध होतील. बाजारात पुस्तकं उपलब्ध नसल्याच्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर परिषदेनं हे स्पष्ट केलं.

<><><><><>

मुंबई- पुणे महामार्गावर सर्व प्रकारच्या हलक्या आणि अवजड वाहनांची वाहतूक उद्या दुपारी १२ ते २ या वेळेत पूर्णतः बंद असेल. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या महामार्गावर गॅन्ट्री बसवण्यात येणार असून या वेळेत प्रवासासाठी पर्यायी मार्गाचा वापर करावा असं आवाहन महामंडळाने केलं आहे.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यात पाणी टंचाईचं भीषण स्वरूप दिसायला लागलं आहे. सध्या मनमाड शहराला महिन्यातून एकदा, नांदगाव शहरामध्ये 22 ते 23 दिवसाआड, चांदवडला पाच ते सहा दिवसाआड, येवल्याला पाच दिवसांनी, मालेगावला दोन दिवसांनी, सटाणा सिन्नर आणि वणीत एक दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. अनेक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे.

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

विदर्भात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी काल कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त तापमान ब्रह्मपुरी इथं ४२ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणई पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**